क्र.२/नसचि/प्रशासक/१७/२०२३-२०२४
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ०५ मार्च, २०२४

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक - १७/२०२३-२०२४

## सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना सर्वसाधारण सभेची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **मंगळवार दि.०५/०३/२०२४ रोजी सायंकाळी ०५ : ३० वाजता महानगरपालिका मंगलधाम कार्यालय, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

### परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.२९/०२/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. श्री.महंमद इब्राहीम गुलामदस्तगीर मोमीन, शिपाई सामान्य प्रशासन विभाग सांगली यांचे वैद्यकीय देयकाचे परिपुर्ती बिलाची रक्कम आदा करणेस मान्यता देणेकामी. **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.२९/०२/२०२४ चे विषयपत्र.**

३. केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० व या अभियानाच्या समन्वयातुन अमृत मित्र उपक्रमा अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील महिला बचत गटांकडून पाण्याचे नमुने तपासणे व पाण्याची बिले वाटप करणेस मान्यता देणेकामी. **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.०५/०३/२०२४ चे विषयपत्र.**

४. महानगरपालिका क्षेत्राबाहेरील इतर ग्रामपंचायतीच्या हद्दीमधील घनकचरा मिरज-बेडग रोड व समडोळी रोड कचरा डेपोमधील दैनंदिन कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता उभारण्यात आलेल्या प्रकल्पामध्ये शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया व विल्हेवाट लावणे व याकामी प्रती टन र.रु.७९२/- मात्र प्रमाणे टिपींग फी दरमहा महानगरपालिकेकडे जमा करणेस मान्यता देणेकामी. **उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन विभाग) यांचे दि.०५/०३/२०२४ चे विषयपत्र.**

**मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे आदेशानुसार**

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १७/२०२३-२४ दिनांक :- ०५/०३/२०२४ चे इतिवृत्त

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण प्रशासक सभा क्र.१७ दि.०५/०३/२०२४ रोजी महापालिकेच्या मंगलधाम कार्यालय,सांगली येथे सायंकाळी ०५:३० वाजता आयोजित करणेत आलेली होती. सदर प्रशासक सर्वसाधारण सभेकरीता खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ. क्र. | उपस्थितांची नावे | अ. क्र. | उपस्थितांची नावे |
|---|---|---|---|
| १. | श्री.सुनिल पवार – प्रशासक | २. | श्री.संजय ओहोळ – अतिरिक्त आयुक्त,मिरज |
| ३. | श्री.राहुल रोकडे - उपायुक्त,सांगली | ४. | श्रीमती स्मृती पाटील – उपायुक्त,मिरज |
| ५. | श्री.पंडीत पाटील – उपायुक्त मालमत्ता कर व इतर | ६. | श्री.वैभव साबळे – उपायुक्त मालमत्ता व्यवस्थापन |
| ७. | श्री.पृथ्वीराज चव्हाण –शहर अभियंता | ८. | श्री.शिरिष धनवे – मुख्य लेखापरिक्षक |
| ९. | श्री.रविंद्र ताटे - वैद्यकिय आरोग्याधिकारी (आरोग्य) | १०. | श्री.वैभव पाटील - वैद्यकिय आरोग्याधिकारी (वैद्य.सेवा) |
| ११. | श्री.राजेंद्र काकडे- नगररचनाकार,मिरज/कुपवाड | १२. | श्री.विनायक शिंदे – प्रशासन अधिकारी |
| १३. | श्री.चिदानंद कुरणे - कार्यकारी अभियंता, पा.पु./ जल.वि. | १४. | श्री.सहदेव कावडे– सहा.आयुक्त,प्र.स. क्र.१ |
| १५. | श्री.सचिन सागावकर – सहा.आयुक्त,प्र.स.क्र.२ | १६. | श्री.मानसिंग पाटील - सहा.आयुक्त,प्र.स.क्र.३ |
| १७. | श्री.अनिस मुल्ला- सहा.आयुक्त,प्र.स.क्र.४ | १८. | श्री.तेजस शहा - ज्युनि.इंजि.वर्कशॉप,सांगली/जलवि |
| १९. | श्री.परमेश्वर हलकुडे – नगर अभियंता सांगली. | २०. | श्री.भगवान पांडव - नगर अभियंता मिरज / ना.दा.नि.कक्ष |
| २१. | श्री. अमरसिंह चव्हाण – विद्युत अभियंता | २२. | श्री.आठवले – प्रशासन अधिकारी शिक्षण विभाग |
| २३. | श्री.गिरीष पाठक- उद्यान अधिक्षक | २४. | श्री.नकुल जकाते – सिस्टिम मॅनेजर |
| २५. | श्री.सुनिल माळी- अग्निशमन अधिकारी | २६. | श्री.विनायक जाधव – ज्यु.इंजिनिअर वर्कशॉप मिरज. |
| २७. | श्री. सुनिल पाटील – विशेष कार्यकारी अधिकारी पा.पु. | २८. | श्री.अमजद जेलर – क्रिडा अधिकारी |

महापालिका सचिव यांनी सभेच्या सुरुवातीला मा.प्रशासक व सर्व अधिकारी यांचे स्वागत करुन, सभेच्या कामकाजास मा.प्रशासक यांच्या आदेशाने सुरुवात केली.

| | |
|---|---|
| विषय क्र. ०१ | मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.२९/०२/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे. |
| प्रशासक | विषय मंजूर |
| विषय क्र. ०२ | श्री.महंमद इब्राहीम गुलामदस्तगीर मोमीन, शिपाई सामान्य प्रशासन विभाग सांगली यांचे वैद्यकीय देयकाचे परिपुर्ती बिलाची रक्कम आदा करणेस मान्यता देणे |
| प्रशा.अधि.आस्थापना | कर्मचारी वैद्यकिय बिलाच्या ९०% रक्कम आदा करणेची आहे. |
| सहा.आयुक्त प्र.स.क्र.१ | शासकीय कर्मचारी व शासकीय अधिकाऱ्यांच्या प्रमाणे महानगरपालिकेच्या कायम कर्मचाऱ्यांच्या कुटुंबालासुध्दा वैद्यकीय बिल परिपुर्तीचा लाभ लागू करण्यात यावा. सध्या फक्त कर्मचाऱ्याला हा लाभ मिळतो. कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यांना लाभ दिला जात नाही. तो देण्यात यावा. |
| प्रशासक | कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला लाभ का दिली जात नाही.? MCSR लागू नाही काय? |
| सहा.आयुक्त प्र.स.क्र.१ | MCSR लागू आहे तरीही कुटुंबाल लाभ दिला जात नाही तो देण्यात यावा. |
| उपायुक्त मुख्यालय | MCSR लागू आहे तसेच यापुर्वी ठराव झालेला आहे. परंतु कर्मचारी संख्या खुप असल्याने लागू केलेला नाही. |
| प्रशासक | शासनाच्या जी.आर. नुसार महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या कुटुंबालाही वैद्यकीय बिल परिपुर्तता देण्यास मान्यता देण्यात येत आहे. |

...२...

| | |
|---|---|
| **विषय क्र. ०३** | केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० व या अभियानाच्या समन्वयातुन अमृत मित्र उपक्रमा अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील महिला बचत गटांकडून पाण्याचे नमुने तपासणे व पाण्याची बिले वाटप करणेस मान्यता देणे |
| **पाणी पुरवठा अभियंता** | अमृत २.० अंतर्गत महिला बचत गटांना पाण्याची बिले वाटप करणे तसेच पाण्याचे नमुने तपासण्याचे काम देण्याचे शासनाचे निर्देश आहेत तसेच याकामी शासनाचे अनुदान मिळणार आहे. |
| **समन्वयक NULM** | शासनाकडून ८ बचत गटांची नावे प्राप्त झालेली आहे. सदर बचत गटांना बिले वाटप व पाणी नमुने तपासणीचे काम देता येईल. |
| **प्रशासक** | विषय मंजुर |
| **विषय क्र. ०४** | महानगरपालिका क्षेत्राबाहेरील इतर ग्रामपंचायतीच्या हद्दीमधील घनकचरा मिरज-बेडग रोड व समडोळी रोड कचरा डेपोमधील दैनंदिन कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता उभारण्यात आलेल्या प्रकल्पामध्ये शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया व विल्हेवाट लावणे व याकामी प्रती टन र.रु.७९२/- मात्र प्रमाणे टिपींग फी दरमहा महानगरपालिकेकडे जमा करणेस मान्यता देणे |
| **वैद्यकीय आरोग्याधिकारी** | महानगरपालिका क्षेत्रा बाहेरील ग्रामपंचायतींकडून विचारणा होत आहे. त्यांच्या गावातील कचरा आपल्या कचरा डेपोवर टाकण्यास परवानगी मागत आहेत व फी देण्यास तयार आहेत. |
| **प्रशासक** | किती रक्कम आकारणी करणार? |
| **वैद्यकीय आरोग्याधिकारी** | र.रु.७२०/- प्रती टन व त्यामध्ये १०% व्यवस्थापन खर्च धरुन एकूण र.रु.७९२/- अशी प्रती टन रक्कम आकारणी करण्यात येणार आहे. |
| **प्रशासक** | रितसर ग्रामपंचायतींकडून सामंजस्य करार करण्यात यावा. तसेच जैविक वैद्यकीय, ई-वेस्ट, स्लॉटर वेस्ट, मृत जनावरे या स्वरुपाचा कचरा टाकण्यास परवानगी देण्यात येवू नये. या अटीवर विषय मंजुर. |

येणेप्रमाणे सभेचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर मा.प्रशासक यांनी सभा संपलेचे जाहिर केले.

**दिनांक :- ०५/०३/२०२४**

(सुनिल पवार)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १७/२०२३-२४

**सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :-** ९० **दिनांक :- ०५/०३/२०२४**

**विषय क्रमांक :- ०१**

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.२९/०२/२०२४ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र. ८८ ते ८९ चे कार्यवृत्त वाचून सर्वानुमते कायम करणेत येत आहे.

(सुनिल पवार)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १७/२०२३-२४

**सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :-** ८९ **दिनांक :- ०५/०३/२०२४**

**विषय क्रमांक :- ०२**

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.२९/०२/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

श्री.महंमद इब्राहीम गुलामदस्तगीर मोमीन, शिपाई सामान्य प्रशासन विभाग सांगली यांनी त्यांना तोंडाचा कॅन्सर झालेने त्यांचे ऑपरेश व औषधोपचाराकरिता झालेला खर्च र.रु.३,७४,०००/- मात्रचे वैद्यकीय देयकाची ९०% प्रमाणे होणारी र.रु.३,३६,६००/- मात्र परिपुर्ती बिलाची रक्कम मागणी केली आहे. सदर बिलाची पडताळणी वैद्यकीय आरोग्याधिकारी यांनी केलेली असुन, शासन निर्णयानुसार ९०% प्रमाणे होणारी र.रु.३,३६,६००/- मात्र रक्कम आदा करणेस वैद्यकीय आरोग्याधिकारी यांनी शिफारस केलेली आहे. त्यानुसार श्री.महंमद इब्राहीम गुलामदस्तगीर मोमीन, शिपाई सामान्य प्रशासन विभाग सांगली यांना त्यांच्या वैद्यकीय देयकाची परिपुर्ती आदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेच्या आस्थापनावरील कायम कर्मचारी यांच्या कुटुंबाला देखील महाराष्ट्र राज्य (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ मधील तरतुद तसेच मा.महाराष्ट्र शासन निर्णय एसजी/२००५/९/प्रक्र-१ दि.११/०५/२००५ नुसार आजारपणावर घेतलेल्या औषधोपचाराचे बिल आदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(सुनिल पवार)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

प्रशासन अधिकारी (सभा)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १७/२०२३-२४

**सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :-** ०२ **दिनांक :- ०५/०३/२०२४**

**विषय क्रमांक :- ०३**

---

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.०५/०३/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० व या अभियानाच्या समन्वयातुन अमृत मित्र उपक्रमा अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील महिला बचत गटातील सदस्यांना उपजिविकेची संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाद्वारे सुरु असलेल्या अमृत मित्र उपक्रम सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात राबविणेबाबत मा.महाराष्ट्र शासनाने स्वयंसहायता बचत गटामधील सदस्यांना अमृत मित्र म्हणून निवड करुन त्यांना अमृत अभियानातील प्रकल्पाशी निगडीत पाणी पुरवठा, मलनि:सारण व हरितक्षेत्र विकास संबंधित विविध कामे देणे बाबत सूचित केलेले असून, मा.शासनाने सदर कामगिरी करणेकामी महानगरपालिका क्षेत्रातील एक तांत्रिक व चार अतांत्रिक महिला बचत गटांची यादी महानगरपालिकेस पाठविलेली आहे. सदर महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय यांच्याकडून प्राप्त झालेल्या (१) एकता महिला बचत गट, (२) सिध्दी महिला बचत गट, (३) क्रांती ज्योती महिला बचत गट, (४) साधना महिला बचत गट, (५) आदर्श महिला बचत गट या पाच बचत गटांकडून जास्तीत जास्त कामे करुन घेण्याबाबत सूचित केले आहे.

त्यानुसार उपरोक्त महिला बचत गटांना महानगरपालिका क्षेत्रातील दररोज २४ पाण्याचे नमुने तपासणे अंदाजपत्रकीय र.रु.३,७५,०००/- व महानगरपालिकेची पाण्याची बिले वाटप करणे एकूण ६०००० बिले प्रती बिल र.रु.५/- प्रमाणे र.रु.३,००,०००/- प्रमाणे कामगिरी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच सदरकामी होणाऱ्या खर्चास मा.शासनाकडून निधी प्राप्त होणार असलेने त्याबाबत निधी मागणीसाठी सविस्तर प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

प्रतीपु लवाजमेयास -

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १७/२०२३-२४

**सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :-** ९३ **दिनांक :-** ०५/०३/२०२४

**विषय क्रमांक :-** ०४

---

सोबतचे उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन विभाग) यांचे दि.०५/०३/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्राबाहेरील इनामधामणी ता.मिरज जि.सांगली या ग्रामपंचायतीने त्यांच्या गावातील घनकचरा टाकणेसाठी ग्रामपंचायतीकडे जागा उपलब्ध नसल्याने महापालिकेच्या बेडग रोड येथील कचरा डेपोवर कचरा टाकणेस परवानगी मागीतलेली आहे. त्यानुसार महापालिका क्षेत्राबाहेरील इतर ग्रामपंचायतीच्या हद्दीमधील घनकचरा मिरज-बेडग रोड व समडोळी रोड कचरा डेपोमधील दैनंदिन कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरिता उभारण्यात आलेल्या प्रकल्पामध्ये शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया व विल्हेवाट लावणेस सदर ग्रामपंचायतीस स्वत:च्या हद्दीतील ओला व सुका घनकरचरा ग्रामपंचायतीने स्व:मालकीच्या वाहनाने मिरज बेडग रोड किंवा समडोळी रोड येथील कचरा डेपोमध्ये देण्यास ही सभा मान्यता देत असून सदरच्या प्रति टन ओला व सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी र.रु.७२०/- मात्र प्रमाणे टिपींग फी + १०% पायाभूत सुविधांकरिता असे प्रति टन र.रु.७९२/- मात्र महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडे दरमहा भरणा करुन कचरा डेपोवर कचरा टाकणेस मान्यता देणेत येत आहे. तथापि, ग्रामपंचायतीने घनचकऱ्या व्यतिरिक्त अन्य कोणताही कचरा उदा.जैविक वैद्यकीय, ई-वेस्ट, स्लॉटर वेस्ट, मृत जनावरे कचरा डेपोमध्ये टाकण्यात येवु नयेत या अटीवर ही परवानगी देण्यात येत आहे. तसेच, याबाबत वैद्यकीय आरोग्याधिकारी यांनी संबंधित ग्रामपंचायतीं बरोबर महापालिकेच्या शर्ती अटी नुसार सामंजस्य करार करावा असे ही सभा आदेशीत करित आहे.

(सुनिल पवार)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

क्र.आ.उप.

**महापालिका सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका